Volume-I (2020)
Issue-1 (October-2020)

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multi-Disciplinary E-Journal

ISSN : 2582-9173

# सतराव्या शतकातील स्त्री अस्मितेचे प्रगटीकरण 'सावित्री देशमुख'

**डॉ. मंगला गोरे**
इतिहास विभाग प्रमुख,
महिला महाविद्यालय,
नंदनवन, नागपूर

---

आधुनिक युगात स्त्रिया सर्वच क्षेत्रात आपले धाडस दाखवून बुद्धीचातुर्याने आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करत आहे. त्याकरिता तिचे कौतुकही होत आहे. या सर्वांची पाळेमुळे इतिहासात दडलेली दिसून येतात. विशिष्ट काळात, विशिष्ट परिस्थितीत समाजाला अभिप्रेत असलेल्या रुढ प्रतिमा नाकारुन भारतीय स्त्रियांनी स्वतंत्र विचारांच्या स्त्रीची नवी छबी निर्माण केलेली आहे. परंतु पारंपारिक इतिहासाने या स्त्रियांच्या अस्मितेची विस्ताराने दखल घेतलेली नाही. सावित्री देशमुख ही तत्कालीन प्रचलीत समाज प्रवाहाच्या विरोधत उभी राहणारी व आपले अस्मिता प्रगट करणरी स्त्री होती. तिच्या कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात केलेला आहे.

मराठ्यांच्या इतिहासात शिवकाळातील स्त्री शिक्षणाची स्थिती अत्यंत निराशाजनक अशीच होती. राजघराण्यातील आणि उच्च वर्गातील स्त्रियांनाच फक्त शिक्षणाची संधी मिळत होती. राजघराण्यातील स्त्रियांना लष्करी शिक्षणही दिले जात असे. परंतु घौडदौड राजघराण्यातील स्त्रियांनाच अवगत होते असे नाही तर सामान्य स्त्रियाही सहजतेने घोड्यावर बसत असत. हे सावित्री देशमुख नावाच्या स्त्रीने मोगली फौजेत गाजविलेल्या पराक्रमावरुन दिसून येते.

## सावित्री देशमुख

सावित्रीच्या मातुकुळाचा उल्लेख आढळून येत नाही परंतु तिला देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण घराण्याचा वारसा होता. दक्षिण वऱ्हाडात पैनगंगेच्या काठी असणाऱ्या माहुरचे राजे राम उद्धवराव उर्फ उदाराम देशमुख यांची पत्नी सावित्री होय. उदाराम देशमुख निजामशाहीत लखूजी जाधवाचे निष्ठावंत पुरस्कर्ते होते. उदाराम मोगलांच्या सेवेतच लहानाचे मोठे झाले आणि मोगलांच्या सेवेतच इ.स. १६३२ मध्ये मरण पावले. तिचा मुलगा राजे जगजीवनराव हा इ. स. १६५८ मध्ये औरंगजेबाच्या सैन्यात होता. औरंगजेब आणि त्याचा मोठा भाऊ दाराशुकोह याच्यात सामुगड येथे वारसासाठी युद्ध झाले. या वारसा युद्धात जगजीवनराव मरण पावला. या युद्धात औरंगजेबाचा विजय झाला.

## सावित्री देशमुख औरंगजेबाच्या चाकरीत

जगजीवनराव याच्या मृत्युनंतर सावित्रीने स्वतःच्या नेतृत्वात लढा देत युद्ध जिंकलं असावे असे स्पष्ट होते. कारण सैन्याचे नेतृत्व एका स्त्रीने केले असा उल्लेख आहे. पती व मुलाच्या मृत्यूने खचून जाऊन सावित्री

कपाळावर हात ठेवून रडत बसली नाही. मोठ्या धाडसाने आपला नातू बाबूराव याला घेऊन औरंगजेबाच्या चाकरीत दाखल झाली. औरंगजेबाचा मामा शाहिस्तेखान याच्या मोहिमेतही सहभागी झाली असावी म्हणूनच शाहिस्तेखानाच्या मोगली फौजेत एक अस्सल महाराष्ट्रीय ब्राम्हण स्त्री होती. अशी नोंद आहे. वऱ्हाडातील माहूर,पुसद, वाशिम, मालेगाव, भोजले, वारा, तुळशी वगैरे भागाची जहागिरी ती एकटीच सांभाळीत असे.

## हरचंद्रराय यांचा बिमोड

वऱ्हाडातील मोगल राज्यात हरचंद्रराय नावाच्या मोगली सरदाराने बंड केले. कारण हरचंद्रराय हा उदाराम देशमुख दक्षिणचा मनसबदार होण्याआधी वाशिम व माहूर या मोगलांच्या दोन जिल्ह्याचा अधिकारी होता. हरचंद्रराय याने मोगलांचा प्रदेश उध्वस्त केला होता. म्हणून हरचंद्रराय या सरदाराला काढून त्याच्या ठिकाणी उदाराम देशमुखची नियुक्ती झाली होती. उदाराम देशमुखचा नातू बाबुराव याच्या काळात मात्र हरचंद्रराय या मोगली सरदाराने उदारामचा बदला घेण्यास सुरुवात केली. तेव्हा सावित्रीबाईंने नातवाच्या संरक्षणासाठी स्वतः पदर बांधला माहुरच्या डोंगरावरुन फौज घेऊन चालून गेली. अर्थातच तिने लष्करी शिक्षण घेतले असावे. असे दिसून येते.

सावित्रीने स्त्रित्वाची खूण म्हणून निशाण्याच्या काठीला चोळी बांधून ती काठी सैन्यात फिरविली. 'शर्थीने लढा, दुश्मन मारुन काढा, जिंका, तुमच्या वहिनीच्या चोळीची लाज राखा' असा जाहिरनामा काढून सैन्यास आव्हान केले. सैनिकांनीही तिच्या आव्हानाला प्रतिसाद देऊन सैन्य शर्थीने लढले आणि तिच्या नेतृत्वात सैन्याने हरचंद्रराय या मोगल सरदाराचा बिमोड केला. तिने आपल्या नातवाची जहागिरी सांभाळली इथे सावित्रीने आपले नेतृत्व कौशल्य व लढाऊबाणा सिद्ध करत आपली जहागिरी कायम ठेवली..

## औरंगजेबाने दिलेला 'रायाबगण' हा किताब

सावित्रीने म्हणजेच एका स्त्रीने हरचंद्रराय या मोगल सरदाराचा पराभव केला परिणामी तिच्या पराक्रमाची, शौर्याची बातमी साम्राज्यात पसरली. औरंगजेबाने तिच्या पराक्रमावर खूश होऊनच तिला दरबारात बोलाऊन 'पंडिता' आणि 'रायबागण' हा किताब बहाल केला.रायबागण याचा अर्थ राजव्याघ्री (राज्याची वाघीण) होय. कविन्द्र परमानंद कृत श्री शिवभारत या ग्रंथात तिचा या नावाचा उल्लेख आहे. तिने केलेल्या धड्सावरून तिच्या पराक्रमावरून ती माहुरची वाघीणच होती असे दिसते. तीच माहुरची मशहूर पंडिता रायबागण होय.

## शिवाजी विरोधात रायबागणची रवानगी

सन १६६१ मध्ये दक्षिणचा मोगल सुभेदार शाहिस्तेखान याने शिवाजीवर आक्रमण करण्यासाठी कारतलबखनाला पाठविले होते तेव्हा रायबागण हिलाही कारतलबखानाबरोबर पाठविले होते. रायबागण हिने शिवाजी विरुद्ध मोगलांच्या बाजूने शस्त्र उपसले. तेव्हा तिच्याशी लढतांना शिवाजीची खास आज्ञा होती. स्त्री शस्त्रविरहित न मारावी. शस्त्र धारण केले असता निंद्य नाही. या मोहिमेत राजे यशस्वी झाले. मोगल सैन्याचा पराभव झाला तेव्हा लढण्यात अर्थ नाही म्हणून तिने कारतलबखानाला शिवाजीला शरण जाण्याचा सल्ला दिला.

असाही उल्लेख आढळून येतो. रायाबगण हिला शिवाजीच्या सैन्याने कैद केले इतकेच नव्हे तर तीचा सन्मान करून तिला परतही पाठविले. तिनेही स्वतःला शिवाजीची धर्मकन्या म्हणवून घेतले.

रायबागणचे एक पराक्रमी स्त्री म्हणून शिवाजीलाही कौतुक वाटले असे बखरकर म्हणतो. ही बाई अत्यंत कर्तबगार, धर्मिक वृत्तीची मुत्सद्दी व अभिमानी होती, परंतु तो अभिमान होता. मुगल सुलतानाच्या सेवेत नवरा मेल्यावर इतर स्त्रियांप्रमाणे दुःख करीत घरात बसून न राहता पदर बांधून आणि तलवार घेवून मोगलांच्या फौजेत हजर होती. मोगलांकडील एका फौजेच्या तुकडीच्या प्रमुखपदी उदाराम देशमुखाची बायको रायबागण हिची नेमणूक केली होती. ती युद्धकला निपूण, निर्भय व स्वामीभक्त स्त्री होती. तत्कालीन प्रवाहाच्या विरोधात जाऊन तिने उचलेले पाऊल खरोखरच आजच्या समस्त स्त्रीवर्गासाठी प्रेरक व मार्गदर्शक आहे. असेच म्हणता येईल.

२१ व्या शतकात स्त्रिया सर्वच क्षेत्रात उंच झेप घेत आपली योग्यता स्पष्ट केलेली आहे. परंतु काळाचा विचार केल्यास राजपराण्यातील स्त्रियांनी आपल्या कतृत्वाची मोहर उमटविलेली मोगलांकडे चाकरी करणाऱ्या सरदारांच्या स्त्रिया अशाप्रकारे पराक्रम गाजवितांना आढळळून येत नाही. परंतु सावित्रीने मात्र न डगमगता पुरुषी वर्चस्व असणाऱ्या क्षेत्रात आपली ओळख निर्माण केली. काळाच्या कसोटीवर तिचे शौर्य व पराक्रम खरोखरच कौतुकास्पद आहे.

**संदभ्र ग्रंथ सूची**


- गुजर; मा.वी. (संपा.), करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने भाग २, पुणे, १९६२ लेखांक ३८,
- देशपांडे प्र. न. (संपा.) अखिल महाराष्ट्र परिषद, १९९५, पृ. ९६, ९७.
- देशमुख; विजय, शककर्ते शिवराय, खंड १, छत्रपती सेवा प्रतिष्ठान, नागपूर, तृतीय आवृत्ती, २०१०, पृ. ३६०.
- पुरंदरे; बाबासाहेब, राजा शिवछत्रपती, २००९, पृ. ३५८.
- सामंत; डॉ. श्रीनिवास, वेध महामानवाचा, देशमुख अँड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., चौथी आवृत्ती, २००९, पृ. १४२.
- शिवकाव्य खंड भाग १, पृ. ९८; 'रायबागण' म्हणजे स्त्रीशार्दूल, राजव्याघ्री हे शब्द शिवकाव्यात आहे.
- साने; का. ना. (संपा.) सप्त प्रकरणात्मक शिवाजी बखर, चौथी आवृत्ती, पुणे.